In case of non-receipt of the LoF, the Public Shareholders holding the Equity Shares may download the same from the website of SEBI at www.sebi.gov.in, Manager to the Offer at www.ftfinsec.com; and BSE at www.bseindia.com. Alternatively, they may participate in the Offer by providing their application in plain paper in writing signed by all shareholder(s), stating name, address, number of Equity Shares held, client ID number, DP name, DP ID number, number of Equity Shares tendered and other relevant documents and other relevant documents as mentioned in Paragraph 8.5 (Page 21) of the LoF.
6. **Any other change suggested by SEBI in their comments to be incorporated**
In terms of Regulation 16(1) of the SEBI (SAST) Regulations,2011 the draft Letter of Offer was submitted to SEBI on December 22, 2021. On January 21, 2022, SEBI, vide its email, issued its comments on the Draft Letter of Offer. These comments have been incorporated in the Letter of Offer. These comments and other key changes (occurring after the date of the Public Announcement) have been incorporated in the LoF. These changes in the LOF include the following: (i) on page no. 2, updates to the schedule of major activities of the Open Offer, and consequential updates to the dates mentioned in the LoF; (ii) in para 3.1.5 on page 8 (iii) in para 3.2.9 on Page No. 9 (iv) at point 4 on page no. 10 & 11 (v) at point 5 on page 11 & 12 (vi) at point 8.1.2 on page 18 (vii) at point 9 on page 22 and (viii) at point 10 on page 23.
7. **Any other material change from the Date of Public Announcement**
There have been no material changes in relation to the Offer since the date of the PA.
8. **Status of Statutory and Other Approvals**
- As of the date of the LoF, to the best of the knowledge of the Acquirer and PACs, there are no statutory or other approvals required to complete the Offer.
- However, in case any statutory approvals are required by the Acquirer / the PACs at a later date before closure of the Tendering Period, the Offer shall be subject to such statutory approvals and the Acquirer shall make the necessary applications for such statutory approvals.
- NRI and OCB holders of the Equity Shares, if any, must obtain all requisite approvals required to tender the Equity Shares held by them in this Offer (including but not limited to, the approval from the RBI, since the Equity Shares validly tendered in this Offer will be acquired by a non-resident entity), if applicable, and submit such approvals along with the Form of Acceptance and other documents required to accept this Offer.
Further, if the Public Shareholders who are not persons resident in India (including NRIs, OCBs, FIIs and FPIs) had required any approvals(including from the RBI or any other regulatory body) at the time of the original investment, in respect of the Equity Shares held by them currently, they will be required to submit copies of such previous approvals along with the other documents required to be tendered to accept this Offer.
If such approvals are not submitted, the Acquirer reserve the right to reject such Equity Shares tendered pursuant to this Offer. If the Equity Shares are held under the general permission of the RBI, the non-resident Shareholders should state that the Equity Shares are held under such general permission and whether such Equity Shares are held on a repatriable basis or a non-repatriable basis
9. **Schedule of Activities**
The Schedule of Activities has been revised and the necessary changes have been incorporated in the LOF at all relevant places. The Revised Schedule of Activities is in compliance with the applicable provisions of SEBI(SAST) Regulations, 2011 and the same is as under:

Activity	Schedule	
	Day and Date	Revised Day and Date
Date of the Public Announcement	09.12.2021 (Tuesday)	09.12.2021 (Tuesday)
Date of publishing of the DPS	15.12.2021 (Wednesday)	15.12.2021 (Monday)
Last date of filing of the draft Letter of Offer with SEBI	22.12.2021 (Wednesday)	22.12.2021 (Wednesday)
Last date of Public Announcement for a Competing Offer(s)	12.01.2022 (Wednesday)	12.01.2022 (Wednesday)
Last date for receipt of comments from SEBI on the draft Letter of Offer (in the event SEBI has not sought clarification or additional information from the Manager to the Offer)	12.01.2022 (Wednesday)	21.01.2022 (Friday)
Identified Date*	13.01.2022 (Thursday)	24.01.2022 (Monday)
Last date by which Letter of Offer will be dispatched to the Public Shareholders whose name appears on the register of members on the Identified Date	20.01.2022 (Thursday)	01.02.2022 (Tuesday)
Last date by which the Committee of Independent Directors of the Board of Directors of the Target Company shall give its recommendations to the Public Shareholders of the Target Company for this Offer	25.01.2022 (Tuesday)	04.02.2022 (Friday)
Last date for Upward revision in Offer Price/ Offer Size	24.01.2022 (Monday)	07.02.2022 (Monday)
Date of Publication of Offer opening Public Announcement in the newspaper in which DPS has been published	27.01.2022 (Thursday)	07.02.2022 (Monday)
Date of commencement of Tendering Period ("**Offer Opening Date**")	28.01.2022 (Friday)	08.02.2022 (Tuesday)
Date of closure of Tendering Period ("**Offer Closing date**")	10.02.2022 (Thursday)	21.02.2022 (Monday)
Last date of communicating the rejection/ acceptance and completion of payment of consideration or refund of Equity Shares to the Public Shareholders of the Target Company	24.02.2022 (Thursday)	07.03.2022 (Monday)
Last Date for issue of post- offer advertisement	04.03.2022 (Friday)	11.03.2022 (Friday)

**Identified date is only for the purpose of determining the names of the shareholders as on such date to whom the Letter of Offer will be sent. It is clarified that all the Shareholders (registered or unregistered) of the Target Company (except the acquirer and the selling Shareholder)are eligible to participate in this offer any time during the tendering period of the Offer.*

10. Other Information:
- The Acquirer accept full responsibility for the obligations of the Acquirer as laid down in terms of the SEBI (SAST) Regulations and for the information (other than such information as has been provided or confirmed by the Target Company) contained in this Offer Opening Public Announcement cum Corrigendum.
- This Offer Opening Public Announcement cum Corrigendum would also be available on websites of SEBI at www.sebi.gov.in, Manager to the Offer at www.ftfinsec.com, and BSE at www.bseindia.com.

Issued by Manager of the Offer on behalf of the Acquirer:

Fastrack Finsec
Category-I Merchant Banker

FAST TRACK FINSEC PRIVATE LIMITED
B-502, Statesman House, 148 Barakhamba Road, New Delhi – 110001
Telephone: +91-11-43029809
Email:vikasverma@ftfinsec.com
Investor Grievance Email: investor@ftfinsec.com
Website:www.ftfinsec.com
Contact Person: Mr. Vikas Kumar Verma
SEBI Reg. No: INM000012500
CIN: U65191DL2010PTC200381

For & On behalf of Acquirer
Sd/-
Gandhi Nishant S
Acquirer

Date: February 06, 2022
Place: New Delhi

आदरांजली











भारताचा, भेदांपलीकडला सूर...

(पान १ वरून)

त्यांनी प्रत्येक भाषेत गाणं गायलं आहे. दिवाळी असो, ईद असो, कोणताही सण असो... एवढंच कशाला लग्न असलं तरी त्यांचंच गाणं...

माझं असं म्हणणं आहे की शी वॉज कल्चर ऑफ एव्हरीथिंग. लता मंगेशकर म्हणजे भारताची दैनंदिन संस्कृती. त्या म्हणजे सगळ्या जाती, धर्मांच्या पलीकडे जाणारी भारताची संस्कृती. त्या म्हणजे कला, त्या म्हणजे संगीत. एवढंच कशाला, 'लोकसत्ता'च्या संपादकांनी ज्याची आठवण दिली ते 'खामोशी' चित्रपटातलं माझं गाणं, 'हमने देखी है इन आँखो की महकती खुशबू...' आधी नायकासाठी लिहिलं होतं. संगीतकार होते हेमंत कुमार, त्यांनी ते लताजींना देण्याचा निर्णय घेतला तेव्हा मी हे गाणं नायिकेसाठी कसं नाही, ते स्त्रीचं गाणं म्हणून मी पाहात नाही, असं सांगितलं. पण हेमंत कुमारांचा निर्णय : एवढी अनवट चाल लताजीच गातील. हवं तर सिच्युएशन बदला. आता कळतंय... लताजींच्या गाण्यानं जाती, धर्म वा भाषांमधलाच भेद नाही तर लिंगभेदही मिटवला.

त्या आपल्यामध्ये होत्या पण आता त्या सूर्याच्या तेजामध्ये विलीन झाल्या आहेत. आताही त्यांच्या स्वरांचं चांदणं आपल्यावर तसंच बरसणार आहे. सूर्याचं तेज कधीच कमी होणार नाही, तसंच लता मंगेशकरांच्या बाबतीतही आहे.



'तुमच्या स्वाक्षरीऐवजी हे गाणंच वापरा', असे गुलजार यांनी लताबाईंना ज्या गाण्याबद्दल सांगितले, त्या आठवणीचे पान गुलजार यांच्याकडून रविवारी उघडले गेले. त्यासोबतचा चष्मा अर्थात गुलजार यांचा.

■■■

लताजींच्या निधनाने अतीव दुःख झाले. जगभरातील कोट्यवधी नागरिकांमध्ये रितेपणाची भावना आहे. शतकभरात एखादेच असे असाधारण व्यक्तिमत्व जन्मते, याचा प्रत्यय मला त्यांच्या भेटीत वारंवार आला. लताजी देहरूपाने आपल्यात नाहीत, पण त्यांचा दैवी स्वर आपल्याबरोबर कायम राहील.

-रामनाथ कोविंद, राष्ट्रपती

■■■

लतादीदींशी नेहमीच संवाद राहिला, त्यांच्याकडून अपार स्नेह मिळाला हा माझा बहुमान आहे. लतादीदींच्या जाण्याने देशात एक पोकळी निर्माण झाली आहे ती लवकर भरून निघणे अवघड आहे. त्यांच्या आवाजात लोकांना मंत्रमुग्ध करण्याची क्षमता होती.

- नरेंद्र मोदी, पंतप्रधान

■■■

जगाचा क्वचितच एखादा कोपरा असेल, जिथे त्यांचा स्वर पोचला नसेल, ऐकला गेला नसेल. भाषा, सीमा-प्रांत, वंश-धर्म असे अनेक बंध तोडून त्यांच्या स्वरांचाच एक प्रदेश, भवताल निर्माण झाला आहे. आता लतादीदी देहाने आपल्यात नाहीत.पण, अमृतस्वरांनी त्या अजरामर आहेत.त्या अर्थाने त्या आपल्यातच राहतील. अनादी आनंदघन म्हणून त्या स्वरअंबरातून आपल्यावर स्वरअमृत शिंपीत राहतील.

- उद्धव ठाकरे, मुख्यमंत्री

■■■

जगभरातील कोट्यवधी संगीतप्रेमींच्या कानांना तृप्त करणारे अलौकिक स्वर आज हरपले. लतादीदींच्या आवाजाच्या परीसस्पर्शाने अजरामर झालेल्या गीतांच्या माध्यमातून हा स्वर आता अनंतकाळ आपल्या मनांमध्ये गुंजत राहील.

- शरद पवार, अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस

■■■

आपल्या भावगीतांनी ईश्वराला जागविण्याची, प्रेमगीतांनी तरुणाईला खुलवण्याची, देशभक्तीपर गीतांनी जवानांना स्फुरण देण्याची अद्भुत जादू त्यांच्या स्वरात होती.

- भगतसिंह कोश्यारी, राज्यपाल

■■■

भारतरत्न लता मंगेशकर यांच्या निधनाने आठ दशकांहून जास्त भारतीयांच्या मनावर स्वरवर्षा करत तृप्त व शांत करणारा स्वर आता आनंदघन बरसणार नाही. लतादीदींचे जीवन हे शुचिता आणि साधनेचे मूर्तिमंत उदाहरण आहे. संगीत क्षेत्रातील त्यांची साधना आणि आठ दशकांवर अधिक काळ गायनाने त्यांना विश्वमान्यता मिळाली होती. त्यांचे जीवनच सर्वांगीण दृष्टीने पवित्र आणि तपस्याच होते.

- मोहन भागवत, सरसंघचालक

देशाचा मानसन्मान, प्रतिष्ठा जगभरात वाढविण्याचे कार्य त्यांनी केले. संगीत क्षेत्रातील त्यांचे कार्य अतुलनीय आहे. सुमारे ३० हजाराहून अधिक अजरामर गाणी गाऊन संगीत क्षेत्रात त्यांनी स्वरसाज चढविला. चिरतरूण असा स्वर लाभल्याने त्यांचा आवाज जगातील सातवे आश्चर्य म्हणून ओळखला जात असे. संगीतसाधकांना आणि चांगल्या कामासाठी सर्वांनाच प्रेरणा देण्याचे काम त्यांनी कायम केले.

- नितीन गडकरी, केंद्रीय मंत्री

■■■

लतादीदींचा सुवर्णस्वर चाहत्यांच्या मनात कायम रुंजी घालत राहील. अनेक दशके लतादीदींना देशवासीयांचे अपार प्रेम मिळाले.

-राहुल गांधी, काँग्रेस नेते

■■■

लतादीदींचे लाखो चाहते होते. बंगाल तसेच पूर्वेकडील कलावंतांप्रती त्यांना स्नेह होता. बंगालमधील सार्वजनिक ठिकाणी तसेच वाहतूक सिघ्नलवर पुढील पंधरा दिवस लतादीदींची गाणी असतील.

— ममता बॅनर्जी, मुख्यमंत्री पश्चिम बंगाल

■■■

भारतभूचा सूर हरपला. सुमधुर शब्दही हरपला. लताबाईंचा मधुर सूर हा देश-दुनियेत घुमला तो त्यांच्या भावनिक प्रकटीकरणाने. ए मेरे वतन के लोगोसारख्या गीतातून उमटलेले व अनेकांना देशभक्तीची प्रेरणा देणारे, आजवर देशातील कष्टकरी, शेतकऱ्यांसह लढणाऱ्या शहिदांना श्रद्धांजली वाहणारे गीतही अविस्मरणीय आहे. लताबाईंना सलाम, सूरसम्राज्ञीला श्रद्धांजली.

– मेधा पाटकर, सामाजिक कार्यकर्त्या

■■■

स्वातंत्र्यवीर सावरकर यांची निस्सिम भक्ती आयुष्याच्या अखेरपर्यंत त्यांनी जपली. वीर सावरकरांच्या विचारांची तन-मन-धनाने सेवा करण्याचे काम लतादीदींनी केले. लतादीदींचे स्वर हे कायम आपल्यासोबत राहणार आहेत. त्या स्वर्गातूनही सूरवर्षाव नक्कीच करतील.

– देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्षनेते

■■■

लता मंगेशकर हे भारतीयच नव्हे, तर जागतिक संगीत विश्वाला पडलेलं एक स्वप्न होतं. लतादीदींच्या निधनाने संगीत विश्वातील स्वर्गीय सूर हरपला आहे. भारतीय संगीत विश्व आज खऱ्या अर्थाने पोरके झाले आहे. चार पिढ्यांना तृप्त करणारा सूर आज हरपला आहे. त्यांची गाणी आपल्याला सदैव त्यांची आठवण देत राहतील.

—किशोरी पेडणेकर, महापौर

राज्यात आज सार्वजनिक सुट्टी

बँका, केंद्र सरकारी कार्यालये, शाळा बंद

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : भारतरत्न लता मंगेशकर यांच्या निधनामुळे दुखवटा म्हणून राज्य सरकारने उद्या, सोमवारी राज्यात सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. परक्राम्य संलेख अधिनियमानुसार ही सुट्टी जाहीर करण्यात आल्याने राज्य सरकारप्रमाणेच महाराष्ट्रातील केंद्र सरकारची सर्व कार्यालये, राष्ट्रीयीकृत बँकांही या काळात बंद राहतील.

भारतरत्न लता मंगेशकर यांचे दुःखद निधनामुळे संगीत आणि कला विश्वाची अपरिमित हानी झाली आहे. या महान गायिकेला श्रद्धांजली वाहण्यासाठी सोमवारी राज्यात दुखवटा म्हणून सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात येत आहे. ही सुट्टी राज्य सरकारला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार परक्राम्य संलेख अधिनियमानुसार जाहीर करण्यात आलेली असल्याने सर्व सरकारी कार्यालये, शाळा, केंद्र सरकारची राज्यातील कार्यालये, राष्ट्रीयीकृत बँकांच्या शाखा बंद राहतील.

केंद्र सरकारने दोन दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर केलेला असल्याने या काळात कोणतेही सरकारी कार्यक्रम होणार नाहीत.



महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या शिवाजी पार्क परिसरातील नव्या वास्तूच्या प्रवेशावेळी लता मंगेशकर उपस्थित होत्या.

जगाचा व भारताचा इतिहास पाहिला तर लता मंगेशकर या जगात एकमेव आहेत, ज्यांनी आयुष्यात कधी पडता काळ पाहिला नाही. स्वतःच्या करिअरची सुरुवात झाल्यापासून त्यांनी कधी मागे वळून पाहिले नाही. त्यांच्या करिअरचा आलेख नेहमीच नवनवी उंची गाठत राहिला. असे हे एकमेवाद्वितीय व्यक्तिमत्त्व होते.

– राज ठाकरे, अध्यक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना

'ब्रीच कँडी'शी नाते जुळले ...

रुप्सा चक्रवर्ती, इंडियन एक्स्प्रेस

मुंबई : आयुष्य, गाणी, स्टुडिओ, रेकॉर्डिंग, परिवार - अगदी त्या आपल्याकडील 'पैंजण' संग्रहाबद्दलही गप्पा मारत. गेल्या दोन वर्षांत रुग्णालयातील एका व्यक्तीच्या त्या खूप जवळ आल्या होत्या. इतक्या की त्या व्यक्तीच्या आठ वर्षांच्या मुलीशीही त्या 'व्हिडिओ कॉल'वर गप्पा मारत असत...

''आज माझ्या लहान मुलीला खूप दुःख झाले आहे'', असे ब्रीच कँडी रुग्णालयातील डॉ. प्रतित समदानी म्हणाले. २०१९ मध्ये श्वसनाचा त्रास होऊ लागल्यानंतर लता मंगेशकर यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले तेव्हा डॉ. समदानी प्रथम त्यांना भेटले.

लताबाईंच्या आठवणींविषयी डॉ. समदानी म्हणाले, ''आमच्यात एक प्रेमळ नाते निर्माण झाले होते. करोना निर्बंधांमुळे त्या रुग्णालयात येणे टाळत, परंतु आठवड्यातून एकदा तासभर किंवा त्याहून अधिक वेळ त्या माझ्याशी व्हिडिओ कॉलवरून प्रकृतीबद्दल सल्ला घेत असत. या आमच्या संवादादरम्यान त्या अनेकदा आठवणी सांगत. माझ्या आठ वर्षांच्या मुलीशीही लतादीदींचे विशेष जिव्हाळ्याचे नाते निर्माण झाले होते. माझ्याशी सल्लामसलत करताकरता त्या अनेकदा माझ्या मुलीशीही संवाद साधत असत. माझ्या मुलीला लतादीदी इतक्या आवडत असत की तिने त्यांना स्वतःच्या हस्ताक्षरात अनेक पत्रे पाठवली आहेत, असेही डॉ. समदानी यांनी सांगितले.

ब्रीच कँडी रुग्णालयातील डॉक्टर आणि परिचारिकांसाठी, लता मंगेशकर यांचे जाणे अतिशय चटका लावणारे आहे.

ब्रीच कँडीतील जुन्या कर्मचाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार लतादीदींचा या रुग्णालयाशी तीन दशकांहून अधिक काळ संबंध होता.

आम्ही अनेक सेलिब्रिटींना वैद्यकीय सेवा देतो, परंतु आम्ही त्यांच्याशी संवाद साधताना वैयक्तिक गप्पागोष्टी करण्यावर मात्र कठोरपणे मर्यादा घालतो. पण लतादीदी नेहमी स्वतःहून संवाद सुरू करायच्या. कर्मचाऱ्यांना 'ऑटोग्राफ' द्यायलाही त्या कधीच मागेपुढे पाहत नसत, अशी आठवण लताबाईंची २५ वर्षांपासून काळजी घेणाऱ्या परिचारिकेने सांगितली.

पूर्वी, जेव्हा त्या प्रकृतीच्या तक्रारीमुळे रुग्णालयात दाखल होत असत तेव्हा त्या विशेषतः गझल ऐकायच्या. त्यांना पैंजण आवडायची आणि त्या अनेकदा त्यांच्याकडील 'पैंजण' संग्रहाबद्दल आम्हाला सांगत असत, अशी आठवणही एका परिचारिकेने कथन केली.



Reliance
Industries Limited
Growth is Life

नोंदणीकृत कार्यालय: ३रा मजला, मेकर चेंबर्स ४, २२२, नरिमन पॉइंट, मुंबई – ४०० ०२१.
दूरध्वनी: ०२२-३५५५ ५००० • फॅक्स: ०२२-२२०४ २३६८ • ई-मेल: investor.relations@ril.com
CIN: L17110MH1973PLC019786

कंपनी योजना याचिका क्र. सीए (सीएए) क्र.१५/एमबी/२०२२

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड आणि त्यांचे भागधारक व क्रेडिटर्स आणि रिलायन्स सिन्गॅस लिमिटेड आणि त्यांचे भागधारक व क्रेडिटर्स यांच्यातील व्यवस्थेच्या योजनेच्या प्रकरणी

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड, कंपनी कायदा, १९५६ अंतर्गत नोंदणी करण्यात आलेली कंपनी जिचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक: L17110MH1973PLC019786 आहे आणि तिचे नोंदणीकृत कार्यालय ३रा मजला, मेकर चेंबर्स ४, २२२, नरिमन पॉइंट, मुंबई – ४०० ०२१, महाराष्ट्र, भारत येथे आहे.) ... **याचिकाकर्ता कंपनी/हस्तांतरणकर्ता कंपनी**

याचिकाकर्ता कंपनीचे सुरक्षित क्रेडिटर्स, असुरक्षित क्रेडिटर्स आणि इक्विटी भागधारक यांच्या सभेची नोटीस व नोटीसची जाहिरात

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण (''**न्यायाधिकरण**'') मुंबई खंडपिठाने दिनांक २८ जानेवारी, २०२२ च्या आदेशाद्वारे (''**न्यायाधिकरणाचा आदेश**'') कंपनी कायदा, २०१३ (''**कायदा**'') मधील कलम २३० ते २३२ आणि इतर लागू तरतुदींच्या अन्वये रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड आणि त्यांचे भागधारक व क्रेडिटर्स आणि रिलायन्स सिन्गॅस लिमिटेड (''**हस्तांतरण करून घेणारी कंपनी**'') आणि त्यांचे भागधारक व क्रेडिटर्स यांच्यातील प्रस्तावित व्यवस्थेच्या योजनेवर (''**योजना**'') विचारविनिमय करण्यासाठी आणि सुधारणांसह किंवा त्याशिवाय, आणि योग्य वाटल्यास, तिला मंजुरी देण्यासाठी याचिकाकर्ता कंपनीचे सुरक्षित क्रेडिटर्स, असुरक्षित क्रेडिटर्स आणि इक्विटी भागधारक यांची सभा आयोजित करण्याचे निर्देश दिले आहेत.

न्यायाधिकरणाच्या आदेशाच्या अनुषंगाने आणि त्यात निर्देशित केल्यानुसार आणि कायद्यातील लागू तरतुदी व सिक्युरिटीज ॲण्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वॉयरमेन्ट्स) रेग्युलेशन्स, २०१५ यांची पूर्तता करण्यासाठी ह्याद्वारे अधिक सूचना देण्यात येत आहे की, याचिकाकर्ता कंपनीचे सुरक्षित क्रेडिटर्स, असुरक्षित क्रेडिटर्स आणि इक्विटी भागधारक यांची सभा खालील प्रमाणे व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (''**व्हीसी**'')/इतर ऑडिओ व्हिज्युअल माध्यमांद्वारा (''**ओएव्हीएम**'') घेण्यात येईल:

अनु.क्र.	सभा	सभेचा दिवस आणि तारीख	सभेची वेळ
१.	सुरक्षित क्रेडिटर्स	बुधवार, ९ मार्च, २०२२	सकाळी १०.३० (भाप्रवेळ)
२.	असुरक्षित क्रेडिटर्स	बुधवार, ९ मार्च, २०२२	सकाळी ११.४५ (भाप्रवेळ)
३.	इक्विटी भागधारक	बुधवार, ९ मार्च, २०२२	दुपारी २.०० (भाप्रवेळ)

ज्यांचे ईमेलचे पत्ते याचिकाकर्ता कंपनी/डिपॉझिटर्स यांचेपाशी नोंदविण्यात आले आहेत अशा सुरक्षित क्रेडिटर्स, असुरक्षित क्रेडिटर्स आणि इक्विटी भागधारकांना इलेक्ट्रॉनिक मेलने वरील सभेची नोटीस सोबतच्या दस्तऐवजांसह पाठविण्यात आली आहे.

योजनेची प्रत, कंपन्या (तडजोडी, व्यवस्था आणि विलिनिकरण) नियम, २०१६ (''**सीएए नियम**'') मधील नियम ६ सोबत वाचले असता कलम १०२ आणि कायद्यातील इतर लागू तरतुदींसोबत वाचले असता कलम २३० आणि २३२ अन्वये निवेदन आणि सोबतचे दस्तऐवज कंपनीच्या वेबसाईटवर उपलब्ध आहेत आणि https://www.ril.com/InvestorRelations/ShareholdersInformation.aspx येथे पाहू शकता आणि स्टॉक एक्सचेंजेसच्या म्हणजे बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड यांच्या वेबसाईटसवर अनुक्रमे www.bseindia.com आणि www.nseindia.com येथे आणि सभेचे आयोजन करण्यासाठी ई-मतदान आणि इतर सुविधा पुरविण्यासाठी कंपनी द्वारा नेमण्यात आलेली एजन्सी या नात्याने नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (''**एनएसडीएल**'') यांच्या वेबसाईटवर https://www.evoting.nsdl.com येथे उपलब्ध आहेत. तुमची इच्छा असल्यास, योजनेची, सीएए नियम मधील नियम ६ सोबत वाचले असता कलम १०२ आणि कायद्यातील इतर लागू तरतुदींसोबत वाचले असता कलम २३० आणि २३२ अन्वये निवेदनाची, भौतिक प्रत मोफत मिळविता येईल. ह्या संदर्भातील लेखी विनंती याचिकाकर्ता कंपनीचे कंपनी सेक्रेटरी यांचेकडे investor.relations@ril.com येथे पाठवू शकता.

न्यायाधिकरणाने न्यायमूर्ती (निवृत्त) रणजित वसंतराव मोरे, माजी न्यायमूर्ती, मुंबई सर्वोच्च न्यायालय, यांची, त्यांच्या अनुपस्थितीत, न्यायमूर्ती (निवृत्त) के. एस. राधाकृष्णन्, माजी न्यायमूर्ती, भारताचे सर्वोच्च न्यायालय, यांची, याचिकाकर्ता कंपनीचे सुरक्षित क्रेडिटर्स, असुरक्षित क्रेडिटर्स आणि इक्विटी भागधारक यांच्या सभेचे अध्यक्ष म्हणून नेमणूक केली आहे. श्री. विशाल अगरवाल, व्यावसायिक चार्टर्ड अकौन्टन्ट, डेलॉइट्टे हस्किन्स ॲण्ड सेल्स एलएलपी, चार्टर्ड अकौन्टन्ट आणि त्यांच्या अनुपस्थितीत, श्री. हेमल मेहता, व्यावसायिक चार्टर्ड अकौन्टन्ट, डेलॉइट्टे हस्किन्स ॲण्ड सेल्स एलएलपी, चार्टर्ड अकौन्टन्ट, हे उपरोल्लेखित सभेचे स्क्रुटिनायझर म्हणून काम करतील. सुरक्षित क्रेडिटर्स, असुरक्षित क्रेडिटर्स आणि इक्विटी भागधारक यांनी त्यांच्या संबंधित सभेत वरील योजना मंजूर केल्यास, त्यानंतर न्यायाधिकरणाच्या पुढील मंजुरीच्या आणि आवश्यक असेल त्यानुसार, नियामक व इतर प्राधिकाऱ्यांच्या मंजुऱ्या, परवानग्या आणि मान्यतांच्या अधीन असेल.

वर नमूद करण्यात आलेल्या सभेला उपस्थित राहण्यास आणि मतदान करण्यास पात्र व्यक्ती सभेच्या अगोदर त्यांचे संबंधित मतदान करण्यासाठी दूरस्थ ई-मतदानाद्वारे मतदान करू शकतील किंवा नोटिसमध्ये दिलेल्या सूचनांनुसार संबंधित सभेत ई-मतदानाद्वारे मतदान करू शकतील. सुरक्षित क्रेडिटर्स, असुरक्षित क्रेडिटर्स आणि इक्विटी भागधारक यांच्या सभा व्हीसी/ओएव्हीएम पद्धतीने घेण्यात येत असल्यामुळे सुरक्षित क्रेडिटर्स, असुरक्षित क्रेडिटर्स आणि इक्विटी भागधारक यांची प्रत्यक्ष उपस्थिती आवश्यक नाही. त्यानुसार, संबंधित सभांसाठी सुरक्षित क्रेडिटर्स, असुरक्षित क्रेडिटर्स आणि इक्विटी भागधारक द्वारा प्रॉक्सीजची नेमणूक करण्याची सुविधा उपलब्ध नाही.

वरील सभांसाठी ई-मतदानासाठी कट ऑफ तारीख आणि दूरस्थ ई-मतदानाचा कालावधी खालील प्रमाणे आहे:

सुरक्षित क्रेडिटर्सची सभा	
ई-मतदानासाठी कट ऑफ तारीख	सोमवार, ३१ जानेवारी, २०२२
दूरस्थ मतदान सुरू होण्याची तारीख व वेळ	शुक्रवार, ४ मार्च, २०२२ रोजी दुपारी १.०० (भाप्रवेळ)
दूरस्थ मतदान बंद होण्याची तारीख व वेळ	मंगळवार, ८ मार्च, २०२२ रोजी सायंकाळी ५.०० (भाप्रवेळ)
असुरक्षित क्रेडिटर्सची सभा	
ई-मतदानासाठी कट ऑफ तारीख	शुक्रवार, ३१ डिसेंबर, २०२१
दूरस्थ मतदान सुरू होण्याची तारीख व वेळ	शुक्रवार, ४ मार्च, २०२२ रोजी दुपारी १.०० (भाप्रवेळ)
दूरस्थ मतदान बंद होण्याची तारीख व वेळ	मंगळवार, ८ मार्च, २०२२ रोजी सायंकाळी ५.०० (भाप्रवेळ)
इक्विटी भागधारकांची सभा	
ई-मतदानासाठी कट ऑफ तारीख	बुधवार, २ मार्च, २०२२
दूरस्थ मतदान सुरू होण्याची तारीख व वेळ	शुक्रवार, ४ मार्च, २०२२ रोजी दुपारी १.०० (भाप्रवेळ)
दूरस्थ मतदान बंद होण्याची तारीख व वेळ	मंगळवार, ८ मार्च, २०२२ रोजी सायंकाळी ५.०० (भाप्रवेळ)

वरील तारीख व वेळेनंतर दूरस्थ मतदान करण्याची परवानगी दिली जाणार नाही आणि एनएसडीएल द्वारा वरील कालावधी संपल्यानंतर दूरस्थ ई-मतदान सुविधा कार्यान्वित करण्यात येईल.

ज्यांनी दूरस्थ मतदान पद्धतीने मतदान केलेले नाही असे सभेला उपस्थित राहणारे सुरक्षित क्रेडिटर्स, असुरक्षित क्रेडिटर्स आणि इक्विटी भागधारक हे ''ई-मतदानासंबंधी सूचनांचे'' पालन करून इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करू शकतील. ज्यांनी दूरस्थ मतदान पद्धतीने मतदान केले आहे असे सुरक्षित क्रेडिटर्स, असुरक्षित क्रेडिटर्स आणि इक्विटी भागधारक सभेला देखील उपस्थित राहू शकतील परंतु पुन्हा सभेच्या ठिकाणी ते त्यांचे मतदान करण्यास पात्र नसतील.

कट ऑफ तारखेला म्हणजे बुधवार, २ मार्च, २०२२ रोजी ज्यांची नावे सदस्यांच्या रजिस्टरमध्ये किंवा लाभधारक मालकांच्या रजिस्टरमध्ये आहेत असेच इक्विटी भागधारक फक्त सूचनेत प्रस्तावित असलेल्या ठरावांवर त्यांच्या/तिच्या/त्याच्या मतदानाचा अधिकार वापरण्यास पात्र असतील आणि इक्विटी भागधारकांच्या सभेला उपस्थित राहण्यास पात्र असतील. इक्विटी भागधारकांचा/लाभधारक मालकांचा मतदानाचा अधिकार (इलेक्ट्रॉनिक समभागधारणेच्या बाबतीत) हा कट ऑफ तारखेला म्हणजे बुधवार, २ मार्च, २०२२ रोजी याचिकाकर्ता कंपनीच्या भरणा केलेल्या इक्विटी भागभांडवलातील त्यांच्या/तिच्या/त्याच्या समभागधारणेच्या प्रमाणात असेल.

डिमटिरिअलाईज्ड पद्धतीचे, छापील पद्धतीचे समभाग धारण करणारे इक्विटी भागधारक आणि ज्यांनी त्यांचे ई-मेलचे पत्ते नोंदविले नाहीत असे इक्विटी भागधारक यांच्यासाठी मतदान करण्याच्या पद्धतीसंबंधी (दूरस्थ पद्धतीने आणि सभेत) माहिती आणि सूचना नोटिसमध्ये देण्यात आल्या आहेत. नोटिस पाठविण्यात आल्यानंतर कंपनीचे भागधारक झालेल्या आणि कट ऑफ तारखेला (येथे वर नमूद करण्यात आलेल्या) समभाग धारण करणाऱ्या व्यक्तींसाठी/यूजर आयडी व पासवर्ड विसरलेल्या व्यक्तींसाठी ते मिळविण्याच्या/तयार करण्याच्या पद्धतीची माहिती देखील नोटिसमध्ये देण्यात आली आहे.

ज्यांनी याचिकाकर्ता कंपनीकडे त्यांच्या ई-मेलच्या पत्याची नोंदणी केलेली नाही/त्यात सुधारणा केलेली नाही अशा छापील स्वरूपातील समभाग धारण करणाऱ्या इक्विटी भागधारकांना https://rkarisma.kfintech.com/shareholders येथे क्लिक करून किंवा फोलिओ क्रमांकाच्या तपशीलासह आणि पॅनकार्डाची स्वयंप्रमाणित प्रत जोडून याचिकाकर्ता कंपनीला investor.relations@ril.com येथे लिहून किंवा केफिन टेक्नॉलॉजीस प्रायव्हेट लिमिटेड, कंपनीचे रजिस्ट्रार आणि ट्रांसफर एजंट यांना rilinvestor@kfintech.com येथे लिहून नोंदणी/सुधारणा करण्याची विनंती करण्यात येत आहे.

ज्यांनी त्यांच्या डिपॉझिटरी सहभागींकडे त्यांच्या ई-मेलच्या पत्याची नोंदणी केलेली नाही अशा डिमटिरिअलाईज्ड स्वरूपात समभाग धारण करणाऱ्या इक्विटी भागधारकांना त्यांचे डिमॅट खाते ज्यांच्यापाशी आहे अशा डिपॉझिटरी सहभागींकडे त्यांच्या ई-मेलच्या पत्याची नोंदणी/सुधारणा करण्याची विनंती करण्यात येत आहे.

कट ऑफ तारखेला म्हणजे सोमवार, ३१ जानेवारी, २०२२ रोजी सुरक्षित क्रेडिटर्सच्या यादीत ज्यांची नावे आहेत असे सुरक्षित क्रेडिटर्स फक्त नोटिसमध्ये प्रस्तावित असलेल्या ठरावांवर त्याच्या/तिच्या/त्यांच्या मतदानाच्या अधिकारांचा वापर करण्यास आणि सभेला उपस्थित राहण्यास पात्र असतील. सुरक्षित क्रेडिटर्सचे मतदानाचे अधिकार हे सोमवार, ३१ जानेवारी, २०२२ रोजी याचिकाकर्ता कंपनीपाशी थकित असलेल्या रकमेच्या प्रमाणात असतील.

कट ऑफ तारखेला म्हणजे शुक्रवार, ३१ डिसेंबर, २०२१ रोजी असुरक्षित क्रेडिटर्सच्या यादीत ज्यांची नावे आहेत असे असुरक्षित क्रेडिटर्स फक्त नोटिसमध्ये प्रस्तावित असलेल्या ठरावांवर त्याच्या/तिच्या/त्यांच्या मतदानाच्या अधिकारांचा वापर करण्यास आणि सभेला उपस्थित राहण्यास पात्र असतील. असुरक्षित क्रेडिटर्सचे मतदानाचे अधिकार हे शुक्रवार, ३१ डिसेंबर, २०२१ रोजी याचिकाकर्ता कंपनीपाशी थकित असलेल्या रकमेच्या प्रमाणात असतील.

सुरक्षित क्रेडिटर्स, असुरक्षित क्रेडिटर्स आणि इक्विटी भागधारक यांना योजनेच्या संदर्भात किंवा वरील सभांमध्ये विचाराधीन असलेल्या प्रस्तावित विषयांबद्दल काही माहिती हवी असल्यास, त्यांना सभेच्या तारखेच्या सात दिवस अगोदर कंपनीला ई-मेल द्वारे investor.relations@ril.com येथे लिहिण्याची विनंती करण्यात येत आहे.

ई-मतदाना विषयी काही चौकशी/तक्रार असल्यास, सुरक्षित क्रेडिटर्स, असुरक्षित क्रेडिटर्स आणि इक्विटी भागधारक यांना खालील संपर्काच्या तपशीलाची नोंद घेण्याची विनंती करण्यात येत आहे:
श्री. अमित विशाल, असिस्टंट व्हाइस प्रेसिडेंट, किंवा **श्रीमती पल्लवी म्हात्रे, मॅनेजर**
नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड
ट्रेड वर्ल्ड, ए विंग, ४था मजला, कमला मिल्स कंपाउंड, लोअर परळ, मुंबई –४०० ०१३
ई-मेल: evoting@nsdl.co.in किंवा AmitV@nsdl.co.in किंवा pallavid@nsdl.co.in
टोल-फ्री क्रमांक: १८०० १०२० ९९० आणि १८०० २२ ४४ ३० [सकाळी ८.०० (भाप्रवेळ) पासून ते रात्री ८.०० (भाप्रवेळ) पर्यंत]

दिनांक: सोमवार, ७ फेब्रुवारी, २०२२

स्वाक्षरी/-
न्यायमूर्ती (निवृत्त) रणजित वसंतराव मोरे
याचिकाकर्ता कंपनीच्या सुरक्षित क्रेडिटर्स, असुरक्षित क्रेडिटर्स आणि इक्विटी भागधारक सभांसाठी नियुक्त चेअरपरसन

www.ril.com